**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 09.08.2024** **वार – शुक्रवार**

---

**घरोघरी तिरंगा**

देशभरात आजपासून येत्या 15 ऑगस्ट या कालावधीत घरोघरी तिरंगा मोहीम राबवण्यात येणार आहे. हा आपला राष्ट्रीय सण असून यात सर्वांना सहभागी करुन घेण्याचं आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विविध जिल्हा प्रशासनांना दूरस्थ माध्यमातून केलं आहे. त्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेच्या वतीनं तिरंगा फेरी, तिरंगा मॅरेथॉन, तिरंगा प्रतिज्ञा, यासह विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचं आणि अनेक अभिनव उपक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. पुण्यातील सर्व नागरिकांनी आपापल्या घरावर 13 ऑगस्ट ते 15 ऑगस्ट या कालावधीमध्ये तिरंगा ध्वज फडकवावा असं आवाहन पुणे महानगरपालिकेनं केलं आहे.

**विद्यापीठ**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नाम विस्तार दिनानिमित्त कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी, यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोरील सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. डॉ. यशवंत मनोहर लिखित "मी सावित्री। सावित्री ज्योति राव फुले" या पुस्तकाच्या हिंदी अनुवादित पुस्तकाचं प्रकाशन यावेळी झालं. प्रा. डॉ. राजेंद्र घोडे यांनी हा अनुवाद केला आहे.

**युवा प्रशिक्षण**

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत 12 वी, आयटीआय, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी प्राप्त अशा सुमारे 575 युवकांना पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विविध विभागात कार्य प्रशिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे. अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी ही माहिती दिली. या योजनेसाठी 18 ते 35 वयोगटातील युवकांनी rojgar.mahaswayam.gov.in या शासनाच्या अधिकृत पोर्टलवर जाऊन आपले अर्ज ऑनलाईन पद्धतीने सादर करावेत असं आवाहन करण्यात आलं आहे.

**पुरस्कार**

कशिश सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष योगेश पवार यांच्या पुढाकारातून दरवर्षी विविध क्षेत्रातील उल्लेखनीय व्यक्तींचा 'ग्लोबल आयकॉन्स ऑफ इंडिया' या पुरस्काराने सन्मान करण्यात येतो. यंदा सूर्य दत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा.  संजय. चोरडिया यांच्या हस्ते अभिनेता समीर चौघुले, हार्दिक जोशी, चिन्मय उदगीर कर, हर्षद आत करी, योगेश शिरसाट, मिलिंद शिंत्रे, अभिनेत्री सुरुची अडारकर-रानडे आणि आरजे संग्राम यांचा सन्मान करण्यात आला. देशाच्या रक्षणासाठी सीमेवर लढताना अपंगत्व आलेले भारतीय लष्करातील जवान सदाशिव घाडगे यांनाही सन्मानित यावेळी करण्यात आलं. यंदा या पुरस्कार सोहळ्याचं 16 वं  वर्षे होतं.

**मुखडे सत्कार**

पंडित पांडुरंग मुखडे यांच्या तबलावादनात सुगम संगीताला लागणारी नजाकत आहे; त्याचवेळी शास्त्रीय गायन-नृत्याला पोषक अशी दमदार साथ हेही त्यांच्या वादनाचं वैशिष्ट्य आहे, असे गौरवोद्गार ज्येष्ठ निरूपणकार उल्हास पवार यांनी नुकतेच पुण्यात काढले. ज्येष्ठ तबलावादक पंडित पांडुरंग मुखडे यांच्या सांगीतिक कारकिर्दीला 50 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मुखडे परिवाराच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मुखडे यांचा सत्कार करण्यात आला.

**झिका**

पुण्यात 26 गरोदर महिलांसह 66 जणांना झिकाची लागण झाली होती. ते सर्वजण पूर्णपणे बरे झाले असल्याची माहिती महापालिकेच्या आरोग्य विभागाने दिली आहे. गेल्या दोन दिवसांपासून शहरात एकही रुग्ण आढळून आलेला नाही, असं आरोग्य अधिकारी डॉ. सूर्यकांत देवकर यांनी सांगितले.

**तक्रारी**

यंदाच्या खरीप हंगामात बी-बियाणे ,खते,औषधे याबाबत शेतक-यांकडून कृषी विभागाकडे 986 तक्रारी आल्या असून; त्यातील 396 तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत. राज्यातील कोणत्याही गावातील शेतक-यांना टोल फ्री क्रमांकाद्वारे आपली तक्रार नोंदवता येईल असं कृषी संचालक विकास पाटील यांनी सांगितलं.

**कृषीदूत**

नारायणगाव इथल्या ग्रामोन्नती मंडळाच्या कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयातील कृषीदूतांनी विशेष तंत्रज्ञान मेळाव्याचं आयोजन नुकतच केलं होतं. यावेळी मृदा शास्त्रज्ञ योगेश यादव आणि विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ राहुल घाडगे यांनी शेतीमधील जैविक तंत्रज्ञान या विषयावर शेतक-यांना मार्गदर्शन केलं.

**गणेशोत्सव**
आगामी सार्वजनिक गणेशोत्सव काळात मोठ्या आवाजात स्पीकर लावण्यास आणि लेसर बीमचा वापर करण्यास महापालिकेनं निर्बंध घातले आहेत. विविध गणेश मंडळांनी मात्र या निर्णयाला तीव्र विरोध दर्शवला आहे. या संदर्भात गणेश मंडळांचे प्रतिनिधी, महापालिका आणि पोलीस प्रशासन यांची संयुक्त बैठक होणार आहे.

**अटक**
पुण्याच्या आयसिस मॉड्युलशी संबंधित दहशतवादी रिझवान अब्दुल हाजी अली याला अटक करण्यात आली आहे. दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने काल रात्री ही कारवाई केल्याचं वृत्त आहे.

**कारवाई**
धायरीच्या अंबाईमाता मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावरच्या अनधिकृत इमारतींवर पुणे महापालिका प्रशासनाने कारवाई केली आहे. या कारवाईत 10 हजार चौरस फुटांवरील आरसीसी बांधकाम जमीनदोस्त करण्यात आलं.

**धरण**
भाटघर धरण 100 टक्के भरल्यामुळे धरणातून 8631 क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. यात आवश्यकतेनुसार बदल केला जाऊ शकतो असं पाटबंधारे विभागानं कळवलं आहे.

**हवामान**
पुणे शहर आणि परिसरात आज पावसाच्या काही हलक्या सरी बरसल्या. उद्याही आकाश अंशतः ढगाळ राहील आणि पावसाच्या हलक्या ते मध्यम सरी पडतील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी सहा वाजता विविध भारती पुणे केंद्रावर ताज्या पुणे वृत्तांतमधे. नमस्कार.**